जा.क्र.तंत्र/फलो/जशिअ/बी टोकन/२२२/१८
सातारा, दिनांक ३०/०६/२०१८

प्रति,

उपविभागीय अधिकारी, सातारा/कोरेगाव/माण-खटाव/ फलटण/कराड/पाटण/वाई
तालुका कृषि अधिकारी,
सातारा/कोरेगाव/खटाव/कराड/पाटण/वाई/जावली/खंडाळा/फलटण/दहिवडी.

विषय – १ जुलै ते ३१ जुलै २०१८ या कालावधीमध्ये डिप सी.सी.टी. व सी.सी.टी. झालेल्या कामांवर बी टोकन कार्यक्रम विशेष मोहिम म्हणून राबविणेबाबत..

वरील विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, सन २०१७-१८ या वर्षामध्ये जलयुक्त शिवार अभियान तसेच पाणी फौंडेशनच्या माध्यमातून डिप सी.सी.टी. (९५० हे.), सी.सी.टी. (४७५ हे.) व कंपार्टमेंट बंडिंग (३,५५१ हे.) इ. क्षेत्र उपचाराची कामे मोठया प्रमाणावर झालेली आहेत. तरी झालेल्या कामांचे बळकटीकरण व्हावे, त्यांचे आयुष्यमान वाढावे म्हणून एक विशेष बाब म्हणून स्थानिक ग्रामस्थ, शाळा यांच्या सहकार्याने झालेल्या कामांवर बी टोकन करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

**या मोहिमेचे उद्देश खालीलप्रमाणे आहेत.**

१. कामांचे आयुष्यमान वाढविणे.
२. पर्यावरणाचे संरक्षण करणे.
३. शाळकरी मुलांना सहभागातून पर्यावरण समतोलाचे महत्व समजावणे.
४. झालेल्या कामांच्या ठिकाणी झाडोरा निर्माण करणे.
५. जमिनीची धूप थांवविणे.

या अनुषंगाने खालीलप्रमाणे नियोजन करण्यात येत आहे.

**१. शालेय विद्यार्थ्यांचा सहभाग.**

- संबंधित गांवातील कृषि सहाय्यक व कृषि पर्यवेक्षक यांनी मुख्याध्यापक यांना भेटून कार्यक्रम अवगत करणे.
- ज्या ठिकाणी प्राथमिक शाळा आहेत त्या शाळांतील इ. ४ थी मधील विद्यार्थ्यांना सहभागी करुन घेणे. मुख्याध्यापक, पर्यावरण प्रेमी व जागरुक स्थानीक नागरीक यांची मदत घेऊन मोहिमेबाबत जागरुकता निर्माण करावी.
- उत्साह वाढविणेच्या दृष्टिने चित्रकला, निबंध व वकृत्व स्पर्धा यांचे आयोजन करण्यात यावे.
- यामध्ये स्थानिक स्तरावरील दानशूर व्यक्तींची मदत घेऊन प्रथम तीन क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रक व पारीतोषिक हे उपविभागीय अधिकारी व तालुका कृषि अधिकारी यांचे उपस्थितीमध्ये वितरण करावे.
- बी टोकन कार्यक्रमाचे दिवशी शाळकरी मुलांना जेवणाचे डब्बे घेऊन येण्याच्या सूचना द्याव्यात.

कृपया पान नं. २ वर पहावे.

- बी टोकन कार्यक्रमाच्या ठिकाणी सुरुवातीला अर्धा तास पर्यावरण व त्याचे संरक्षण या बाबींवर विद्यार्थ्यांमध्ये जागरुकता निर्माण करावी.
- सदर कार्यक्रमाचे ठिकाणी वनभोजनाचा कार्यक्रम ठेवावा.

**कृषि विभागाची जबाबदारी**

- तालुका कृषि अधिकारी यांनी कृषि सहाय्यक व कृषि पर्यवेक्षक यांना मार्गदर्शन करुन मंडल कृषि अधिकारी यांच्या मदतीने गांवे निवडावीत.
- बी टोकन कार्यक्रमास व्यापक प्रमाणात स्थानीक वृत्तपत्रे, वृत्तवाहिन्या या माध्यमातून प्रसिध्दि द्यावी.
- क्षेत्रीय कर्मचा-यांनी शाळकरी विद्यार्थ्यांना सहज पोहोचणे शक्य होईल तसेच कोणत्याही प्रकारची इजा किंवा धोका पोहोचणार नाही अशी स्थळे बी टोकण करण्यासाठी निवडावीत.
- ज्या लाभार्थ्यांच्या क्षेत्रावर कार्यक्रम राबविणार आहे, त्यांना सहभागी करुन त्यांचीही मदत घ्यावी.
- कार्यक्रमाचे दिवशी प्रथम विद्यार्थ्यांना बी टोकन कसे व किती अंतरावर करावे याबाबत प्रात्यक्षिक करुन दाखवावे.
- कार्यक्रमाचे ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी.

**उपविभागीय अधिकारी यांची जबाबदारी**

- उपविभागीय अधिकारी यांना या कार्यक्रमाकरीता **नोडल अधिकारी** म्हणून घोषित करण्यात येत आहे.
- उपविभागीय अधिकारी यांनी गांववार नियोजन करुन खालील प्रपत्रामध्ये अहवाल त्वरीत जिल्हाधिकारी यांना सादर करावा.

| अ. क्र. | गांवाचे नांव | आयोजनाचा दिनांक | कामाचा प्रकार | शालेय विद्यार्थी सहभाग संख्या |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

वरीलप्रमाणे नियोजन करुन मोहिमेची कालबध्द अंमलबजावणी करावी. अशा प्रकारे शालेय विद्यार्थ्यांचा सहभाग घेतल्यास चळवळ निर्माण होईल. जेणे करुन पर्यावरण जोपसना व संवंधन याबाबत जागृती होऊन कार्यक्रमाचा हेतू सफल होईल.

जिल्हाधिकारी,
सातारा

प्रत – मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद, सातारा यांना माहितीसाठी

प्रत – उपविभागीय कृषि अधिकारी, सातारा/कराड/वाई/फलटण यांना पुढील कार्यवाहीसाठी.